Rayat Shikshan Sanstha’s
Dahiwadi College Dahiwadi
Tal Man dist Satara
College News Clipping
Year 2021-22

सकाळ

# युवा महोत्सवात दहिवडी कॉलेजचे यश



दहिवडी : मध्यवर्ती युवा महोत्सवातील यशस्वी विद्यार्थ्यांसोबत डॉ. एस. टी. साळुंखे व मान्यवर.
(रूपेश कदम : सकाळ छायाचित्रसेवा)

**दहिवडी, ता. २ :** शिवाजी विद्यापीठाच्या संत गजानन महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय महागाव (गडहिंग्लज) येथे आयोजित ४१ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात रयत शिक्षण संस्थेच्या दहिवडी कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मूकनाट्य तसेच लोककला या कला प्रकारांमध्ये तृतीय क्रमांक मिळवला. शुभम सावंत, मृणाली निलाखे, प्रणया जगदाळे, निकिता घाडगे, प्रमोद मुळीक, रोहित राठोड, अनिकेत काशिद, संकेत जगदाळे या विद्यार्थ्यांनी हे कलाप्रकार सादर केले. संघव्यवस्थापक म्हणून डॉ. सोनाली पवार व प्रा. अमिर जाधव यांनी काम पाहिले. या सर्वांचे प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे, उपप्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत, उपप्राचार्या एन. एस. साळुंखे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. ए. एन. दडस, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

Satara, Satara-Today
03/01/2022 Page No. 4

सकाळ

# परिवर्तनासाठी समाजजागृती आवश्यक

## डॉ. मोरे; भांडवलीतील दहिवडी कॉलेजच्या श्रमसंस्कार शिबिराचा समारोप




**भांडवली : भर उन्हात डोंगरावरील झाडांना आच्छादन करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व शिक्षक.**
(**रूपेश कदम** : सकाळ छायाचित्रसेवा)

**दहिवडी, ता. ३ :** शाश्वत विकास व अनुकूल परिवर्तनासाठी व्यापक समाजजागृती आवश्यक असल्याचे मत विट्याच्या बळवंत कॉलेजचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी व्यक्त केले.

दहिवडी कॉलेजच्या विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर भांडवली (ता. माण) येथे झाले. या शिबिराच्या समारोपाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे, उपसरपंच दत्तात्रय बारसवडे, युवराज सूर्यवंशी, ग्रामविकास अधिकारी अभिजित ढेंबरे उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. मोरे म्हणाले, "जलसंवर्धनाची तीव्र आवश्यकता लक्षात घेता विद्यापीठ अनुदान आयोगाने जलशक्ती अभियानाची सुरुवात केली आहे. त्यातील मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येकाने आपले सक्रिय योगदान द्या."

प्राचार्य डॉ. साळुंखे यांनी श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी १० हजार वृक्ष संवर्धनार्थ केलेल्या कार्याचे विशेष कौतुक केले. उपसरपंच दत्तात्रय बारसवडे, दीपाली ढेंबरे व किशोर खरात या स्वयंसेवकांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी सर्वोकृष्ट स्वयंसेवक म्हणून कुणाल जाधव व अजिता काळे तसेच महिमानगड स्वयंसेवक गट व रायरेश्वर स्वयंसेविका गटांचा गौरव करण्यात आला. प्रा. राहूल सूर्यवंशी यांनी अहवाल वाचन केले. प्रा. के. एस. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एन. डी. लोखंडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. हनुमंत कायंदे यांनी आभार मानले.

Satara, Satara-Today
04/04/2022 Page No. 4

सकाळ

# परिवर्तनासाठी समाजजागृती आवश्यक

## डॉ. मोरे; भांडवलीतील दहिवडी कॉलेजच्या श्रमसंस्कार शिबिराचा समारोप

**दहिवडी, ता. ३ :** शाश्वत विकास व अनुकूल परिवर्तनासाठी व्यापक समाजजागृती आवश्यक असल्याचे मत विट्याच्या बळवंत कॉलेजचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी व्यक्त केले.

दहिवडी कॉलेजच्या विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिर भांडवली (ता. माण) येथे झाले. या शिबिराच्या समारोपाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे, उपसरपंच दत्तात्रय बारसवडे, युवराज सूर्यवंशी, ग्रामविकास अधिकारी अभिजित ढेंबरे उपस्थित होते.



**भांडवली : भर उन्हात डोंगरावरील झाडांना आच्छादन करताना राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व शिक्षक.**

(**रूपेश कदम :** सकाळ छायाचित्रसेवा)

प्राचार्य डॉ. मोरे म्हणाले, "जलसंवर्धनाची तीव्र आवश्यकता लक्षात घेता विद्यापीठ अनुदान आयोगाने जलशक्ती अभियानाची सुरुवात केली आहे. त्यातील मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येकाने आपले सक्रिय योगदान द्या."

प्राचार्य डॉ. साळुंखे यांनी श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून स्वयंसेवकांनी १० हजार वृक्ष संवर्धनार्थ केलेल्या कार्याचे विशेष कौतुक केले. उपसरपंच दत्तात्रय बारसवडे, दीपाली ढेंबरे व किशोर खरात या स्वयंसेवकांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी सर्वोकृष्ट स्वयंसेवक म्हणून कुणाल जाधव व अजिता काळे तसेच महिमानगड स्वयंसेवक गट व रायरेश्वर स्वयंसेविका गटांचा गौरव करण्यात आला. प्रा. राहूल सूर्यवंशी यांनी अहवाल वाचन केले. प्रा. के. एस. शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एन. डी. लोखंडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. हनुमंत कायंदे यांनी आभार मानले.

Satara, Satara-Today
04/04/2022 Page No. 4

लोकमत

# प्रभाकर देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त मेळावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**दहिवडी** : माण-खटावमधील राष्ट्रवादीचे नेते प्रभाकर देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्ताने गुरुवार, दि. २७ रोजी सकाळी १० वाजता दहिवडी कॉलेज दहिवडी येथे माण-खटाव नोकरी मेळावा आयोजित केला आहे.

या मेळाव्यात वीसपेक्षा जास्त नॅशनल व मल्टी नॅशनल कंपन्या सहभागी होणार आहेत. सहाशेपेक्षा जास्त नोकऱ्यांची संधी उपलब्ध होणार आहे. दहावीपासून पदवीपर्यंत तसेच आयटीआय, तंत्रनिकेतन, अभियांत्रिकी आदी क्षेत्रातील विद्यार्थ्यांसाठी नोकरीची संधी उपलब्ध आहे.

नोकरी मेळाव्यास फक्त माण-खटाव मतदारसंघातील नोकरी इच्छुक तरुण-तरुणींनीच सहभागी व्हावे, मेळाव्यात येताना चार प्रतीत आधारकार्ड, आवश्यक कागदपत्रे घेऊन यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. (वा.प्र)

Hello Satara
Page No. 4 Jan 26, 2022
Powered by: erelego.com

सकाळ

# सुजाता पाटील यांना पीएच. डी. जाहीर



दहिवडी, ता. २७ : दहिवडी कॉलेजमधील ज्युनिअर विभागातील प्रा. सुजाता धीरज पाटील यांना वनस्पतीशास्त्र विषयातून शिवाजी विद्यापीठाची पीएच. डी. पदवी जाहीर झाली आहे.

संशोधन मार्गदर्शक प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी 'स्टडीज ऑन अँटीमायक्रोबियल अँटी ऑक्सीडेंट अँड बायोटोनिक पोटेन्शियल ऑफ सम झिरोफायटिक विड्स फ्रॉम वेस्टर्न महाराष्ट्र' या विषयावर प्रबंध सादर केला होता. प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे, उपप्राचार्या नंदिनी साळुंखे, उपप्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत, डॉ. व्ही. व्ही. कांबळे, डॉ. एस. एम. खेत्रे, डॉ. ए. ए. जगताप, प्रा. सुधीर कुंभार, प्रा. बी. डी. जाधव अभिनंदन केले.

Satara, Main
28/01/2022 Page No. 3

सकाळ

# वाघमारे ठरला 'उत्कृष्ट स्वयंसेवक'

## मुंबईत राष्ट्रीय सेवा योजनेचा राज्य पुरस्कार प्रदान

**दहिवडी, ता. ८ :** दहिवडी कॉलेजचा विद्यार्थी अनिकेत उध्दव वाघमारे यास राज्य शासनाचा राष्ट्रीय सेवा योजनेचा उत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार मिळाला असून उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते त्यास हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

राष्ट्रीय सेवा योजना विभागातून कोरोना कालावधीत घरोघरी जाऊन विविध सर्वेक्षण व उपाययोजनांमध्ये अनिकेतने सक्रिय योगदान दिले आहे. त्याच्या उत्कृष्ट सेवेबद्दल त्याला यापूर्वीही राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे पुरस्कार मिळाले आहेत.



**मुंबई : अनिकेत वाघमारे यास राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करताना उदय सामंत.** (**रूपेश कदम :** सकाळ छायाचित्रसेवा)

रयतचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्रभाकर देशमुख, प्रदीपकुमार शिंदे, नीलिमा पोळ, नंदकुमार खोत, प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. के. एस. शिंदे यांनी अभिनंदन केले.

Satara, Main
09/05/2022 Page No. 2

सकाळ

# दहिवडीतील विद्यार्थ्यांना माहिती अधिकाराचे धडे

## राज्यस्तरीय एकदिवसीय कार्यशाळेत शिवाजी राऊतांनी केले मार्गदर्शन

**दहिवडी, ता. ८ :** येथील दहिवडी कॉलेजमधील राज्यशास्त्र विभाग, डिफेन्स स्टडी एन्टायर विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एकदिवसीय राज्यस्तरीय माहिती अधिकार कार्यशाळेस प्रतिसाद मिळाला. माहिती अधिकार कार्यकर्ते शिवाजी राऊत यांनी कार्यशाळेत मार्गदर्शन केले.

प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे, उपप्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत, उपप्राचार्या एन. एस. साळुंखे, डॉ. ए. एन. दडस, प्रा. बी. आर. पाटील, शेखर परदेशी, प्रा. गणेश गाढवे आदी उपस्थित होते. श्री. राऊत यांनी 'माहिती अधिकारातील प्रमुख तरतुदी व माहिती अधिकाराचे लोकशाहीतील महत्त्व' तसेच 'माहिती अधिकार चळवळीत नागरिकांची भूमिका व जबाबदारी' या विषयावर मार्गदर्शन केले. या वेळी उपस्थितांनी माहिती अधिकाराचा योग्य वापर करण्याची शपथ घेतली. प्राचार्य डॉ. साळुंखे यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रा. भक्ती पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. दत्तात्रय मांजरे, डॉ. एन. डी. लोखंडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. संजय खेत्रे यांनी आभार मानले. कार्यशाळेच्या यशस्वितेसाठी प्रा. महेश भदाणे, प्रा. बी. व्ही. मोरे, प्रा. विक्रम लांडगे, प्रा. माधुरी देशमुख, प्रा. शिवानी काटकर आदींनी परिश्रम घेतले.

Satara, Satara-Today
09/05/2022 Page No. 4

सकाळ

# दहिवडी कॉलेजमध्ये आजपासून क्रीडा महोत्सव

**दहिवडी :** येथील दहिवडी कॉलेजमध्ये उद्यापासून (ता. २) ४ जूनपर्यंत पदवी व पदव्युत्तर वर्गांच्या विद्यार्थ्यांसाठी क्रीडा महोत्सवाचे आयोजन केल्याची माहिती प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे यांनी दिली. क्रीडा महोत्सवाच्या पहिल्या दिवशी मॅरेथॉन, क्रिकेट, फनी गेम, तर दुसऱ्या दिवशी व्हॉलिबॉल, कबड्डी, बॅडमिंटन, रस्सीखेच, कॅरम या क्रीडा स्पर्धांचे आयोजन केले आहे. महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरणाने क्रीडा महोत्सवाची सांगता होईल. मॅरेथॉन स्पर्धेचे 'रन फॉर बेटर हेल्थ' हे घोषवाक्य आहे.

Satara, Main
02/06/2022 Page No. 3



दहिवडी : प्रिंटरचे तीन सेट भेट देताना 'एक्स. डी. सी. डीएन. असोसिएशन'चे पदाधिकारी.

# माजी विद्यार्थी संघाच्यावतीने दहिवडी कॉलेजला तीन प्रिंटर्स भेट

**दहिवडी, दि. ३ (प्रतिनिधी)** - येथील रयत शिक्षण संस्थेच्या दहिवडी कॉलेजच्या माजी विद्यार्थी संघटना 'एक्स. डी. सी. डीएन. असोसिएशन'च्यावतीने महाविद्यालयास कॅनन कंपनीचे स्कॅनर कम प्रिंटरचे तीन सेट भेट देण्यात आले. यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष नंदकुमार खोत म्हणाले, महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी व पायाभूत सुविधांच्या निर्मितीसाठी असोसिएशनच्या माध्यमातून तत्परतेने मदत केली जाईल. प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे म्हणाले, नॅकच्या मार्गदर्शक तत्वांनुसार माजी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी व पायाभूत सुविधांसाठी योगदान देणे अभिप्रेत आहे. सध्या डिजीटल युग आहे. या युगात माजी विद्यार्थी संघाने प्रिंटर्सची केलेली मदत मोलाची आहे. यावेळी माजी विद्यार्थी संघाचे उपाध्यक्ष हेमंतकुमार कुलकर्णी, सिद्धनाथ पतसंस्थेचे चेअरमन सुनील पोळ, जयप्रकाश जाधव, प्रा. आर. डी. जाधव, रावसाहेब देशमुख, पत्रकार रुपेश कदम, उपप्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत, डॉ. ए. एन. दडस, डॉ. एम. जे. लुबाळ, डॉ. एन. डी. लोखंडे हे उपस्थित होते.

प्रभात Mon, 04 July 2022
https://epaper.eprabh

पुण्य नगरी

# दहिवडी कॉलेजचा २३०० वृक्ष लागवडीचा संकल्प

**बिजवडी /** माणदेशी मातीतील विद्यार्थी स्वाभिमानी शिस्तप्रिय व प्रयत्नवादी असल्याने भविष्यकाळात दुष्काळी भागाचा कलंक पुसण्यासाठी महाविद्यालयाने २३०० वृक्ष लागवडीचा संकल्प केला आहे. या उपक्रमास पालकांनी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत महाविद्यालयाने भेट दिलेल्या रोपट्याचे वटवृक्षात रूपांतर करावे, असे प्रतिपादन दहिवडी कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांनी केले. दहिवडी ता. माण येथील महाविद्यालयात ज्युनिअर, वाणिज्य व कला विभागाच्या पालक मेळाव्यात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे म्हणून न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेज अंगापूरच्या प्राचार्या श्रीमती संध्याताई चौगुले उपस्थित होत्या. यावेळी उपप्राचार्य सौ. नंदिनी साळुंखे, उपप्राचार्य डॉ. बळवंत बी. एस., पर्यवेक्षक शिर्के आर. डी., वाणिज्य विभाग प्रमुख मस्के व्ही. एस., मोहिते एम. आर., सुर्यवंशी आर. बी. उपस्थित होते.

जन्सीच्या
चे उद्घाटन



लोकमत

# एस. टी. साळुंखे यांची प्राचार्यपदी निवड

दहिवडी : रयत शिक्षण संस्था संचलित दहिवडी महाविद्यालयाच्या प्राचार्यपदी डॉ. सुरेश तुकाराम साळुंखे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. साळुंखे यांनी प्रभारी प्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत यांच्याकडून पदभार स्वीकारला. डॉ. साळुंखे यांनी रयतच्या राजापूर, श्रीगोंदा, रामानंद नगर, कोल्हापूर येथील महाविद्यालयांत प्राचार्य म्हणून १८ वर्ष काम केले आहे.



Hello Satara
Page No. 3 Aug 05, 2021
Powered by: erelego.com

लोकमत

# अपात्र शिक्षकांना शोधण्याचे शिक्षण विभागापुढे आव्हान

## ७८७४ शिक्षकांची यादी : थेट नोकरीतून काढण्याचे आदेश

लोकमत न्यूज नेटवर्क

नाशिक : शिक्षकांना पात्र ठरविणाऱ्या शिक्षक पात्रता परीक्षेत राज्यातील ७८७४ शिक्षकांना अपात्र ठरविण्यात आल्याने त्यातील नाशिक जिल्ह्यातील अपात्र शिक्षकांना शोधण्याचे मोठे आव्हान जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागापुढे ठाकले आहे.

सुमारे ४८० पानांच्या या अपात्र शिक्षकांच्या यादीत फक्त शिक्षकांची नावे असून, त्यांचे नेमणुकीचे ठिकाण नमूद न करण्यात आल्याने आता सर्व नावे प्रत्येक मुख्याध्यापकाला कळवून त्यांच्याकडून अपात्र शिक्षक शोधण्यात येणार आहेत. राज्य परीक्षा परिषदेने सन २०१९ मध्ये शिक्षकांची पात्रता परीक्षा राज्यात एकाच वेळी घेतली होती.

या परीक्षेत मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार झाल्याची बाब उघडकीस येऊन त्यात आर्थिक देवाण-घेवाणीचे प्रकार घडले. परिणामी शिक्षण परिषद आयुक्त तुकाराम सुपे यांच्यासह काही अधिकाऱ्यांना अटकही करण्यात आली. पुण्याच्या सायबर पोलिसांत या संदर्भात गुन्हा दाखल करण्यात येऊन सखोल चौकशी केली असता, ७८७४ शिक्षकांनी या परीक्षेत गैरप्रकार करून परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र सादर करून नोकरी मिळविली असल्याचे उघडकीस आले.

या सर्व बाबींचा अभ्यास करून शिक्षण आयुक्त शैलजा दराडे यांनी बुधवारी (दि.३) महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०१९ दि. १९ जानेवारी २०२० मध्ये झालेल्या परीक्षेत झालेल्या गैरप्रकारामुळे दाखल झालेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने गैरप्रकारामध्ये समाविष्ट उमेदवारांची संपादणूक रद्द करण्यात येत असल्याचे तसेच त्यांना यापुढे या परीक्षेसाठी कायम स्वरूपी अपात्र ठरविण्यात येत असल्याचे आदेश जारी केले आहेत.

दरम्यान, शिक्षण परिषदेने अपात्र शिक्षकांची यादी जाहीर केल्यामुळे शिक्षण विभागात खळबळ उडाली असून, अपात्र शिक्षकांना थेट नोकरीतून कमी करण्याचे तसेच यापुढच्या परीक्षेसाठी त्यांना अपात्र ठरविण्याच्या या निर्णयामुळे त्यांचे पुढचे सारे मार्ग बंद झाले आहेत.

### तर गुन्हा दाखल करण्याचीही तयारी

- सुमारे ७,८७४ अपात्र शिक्षकांची यादीही त्यासोबत जोडण्यात आली असून, त्यात फक्त शिक्षकांची नावे व त्यांचे परीक्षेचे आसन क्रमांक नमूद करण्यात आल्यामुळे प्रत्येक जिल्ह्यातील अपात्र शिक्षक शोधण्याचे मोठे आव्हान शिक्षण विभागापुढे उभे राहिले आहे.
- त्यामुळे ४८० पानांची शिक्षकांची यादी आता प्रत्येक शाळेच्या मुख्याध्यापकांना पाठवून त्यांच्या शाळेतील कोण शिक्षक यात सहभागी आहेत, याचा अहवाल मागविण्यात येणार असून, मुख्याध्यापकांनी अशा शिक्षकांना तत्काळ नोकरीतून कमी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
- शिक्षण आयुक्तांच्या आदेशानंतरही जर अपात्र शिक्षक शाळेत आढळला तर मुख्याध्यापकावरच गुन्हा दाखल करण्याची तयारीही शिक्षण विभागाने केली आहे.

Nashik Main
Page No. 5 Aug 05, 2022
Powered by: erelego.com

सकाळ

# टवाळखोरांवर हवा पोलिसांचा वचक

## दहिवडीत विद्यार्थिनींसह सामान्यांना त्रास; खुन्नस, हाणामारी प्रकारांत वाढ

**दहिवडी, ता. ४ :** शहरात विशेषतः बस स्थानक व विद्यालयांच्या परिसरात टवाळखोरांचा उच्छाद वाढला आहे. पोलिसांचा वचक राहिला नसल्याने युवकांची मारामारी नित्याचीच बनली आहे. यामुळे विद्यार्थिनींसह परिसर सातत्याने दहशतीखाली असल्याचे पाहायला मिळत आहे.

बस स्थानक परिसरात दोन दिवसांपूर्वी पुन्हा एकदा युवकांच्या गटात राडा झाला. शहरातील टवाळखोर तसेच त्यांच्याशी संगत असणारे विद्यार्थी यांचा सामान्यांना त्रास होत आहे. वारंवार होणाऱ्या या घटना नागरिकांसाठी डोकेदुखी ठरू लागल्या आहेत. टवाळखोरांची वाढती संख्या व त्यांना आवरण्यात पोलिसांना आलेले अपयश शहराच्या शांततेला बाधा ठरू लागले आहे.

शहरात एक महाविद्यालय, एक ज्युनिअर कॉलेज, तीन माध्यमिक विद्यालये, खासगी मराठी शाळा, जिल्हा परिषद शाळा या सर्वांत मिळून सुमारे दहा हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. यात शहरासोबत आजूबाजूच्या गावांतून, खेड्यांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या लक्षणीय आहे. बहुतांशी विद्यार्थी ये-जा करण्यासाठी एसटीचा वापर करतात. त्यामुळे बस स्थानक परिसरात सकाळी, दुपारी बाराच्या सुमारास तसेच संध्याकाळी चारच्या सुमारास मोठी गर्दी असते. या गर्दीचा फायदा घेण्यासाठी टवाळखोरांचा बस स्थानक परिसरात वावर वाढला आहे. एकमेकांना खुन्नस देण्याचे व हाणामारीचे प्रकार घडत आहेत.

यासोबतच रस्त्याने चालत वा सायकलवर ये-जा करणाऱ्या विद्यार्थिनींना छेडछाडीच्या प्रसंगाला सामोरे जावे लागते. विशेषत: कन्याशाळा परिसर व दहिवडी कॉलेज परिसरात असे प्रकार दिसून येत आहेत. शिक्षण बंद होईल, या भीतीने विद्यार्थिनींकडून त्याची वाच्यता होत नसल्याचे दिसून येते. यामुळे टवाळखोरांचे फावते.

### आता तरी चुणूक दाखवा...

दहिवडी पोलिस ठाण्याचे प्रभारी असताना प्रवीण पाटील यांनी अनेकांना वठणीवर आणले होते. त्यामुळेच राजकुमार भुजबळ यांचा कार्यकाळ शांततेत गेला. मात्र, टवाळखोरांनी पुन्हा एकदा डोके वर काढले आहे. त्यामुळे विद्यमान प्रभारी संतोष तासगावकर यांना त्यांच्या कार्यशैलीची चुणूक दाखविण्याची वेळ आल्याचे दिसून येते.

सकाळ पेपर

Satara, Satara-Today
05/08/2022 Page No. 3

# सल्लागारपदी साळुंखे यांची वर्णी

लोकमत न्यूज नेटवर्क

**दहिवडी :** रयत शिक्षण संस्थेच्या दहिवडी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे यांची शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीच्या सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. डॉ. साळुंखे यांनी १५ अधिव्याख्याता व १८ वर्ष प्राचार्य म्हणून कार्यरत असताना विटा, राजापूर या ठिकाणी वृक्ष लागवड केली.

राजापूरसारख्या दुर्गम भागातील महाविद्यालयास डॉ. साळुंखे यांच्या कार्यकालात मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा जिल्हास्तरीय पुरस्कार प्राप्त झाला होता. डॉ. साळुंखे यांनी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी, विविध शिबिरांच्या आयोजनात सक्रिय सहभाग घेऊन रक्तदान शिबिरे, जलसंधारणविषयक प्रभावी कार्य व युवकांसाठी प्रशिक्षण शिबिरांचे नावीन्यपूर्णरीत्या यशस्वी आयोजन करून २० वर्षांपेक्षा जास्त काळ राष्ट्रीय सेवा योजना विभागात आपले योगदान दिले आहे.

सकाळ

# अनिकेत वाघमारेला राज्यस्तरीय पुरस्कार



दहिवडी, ता. १३ : महाराष्ट्र शासनाचा शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चा राष्ट्रीय सेवा योजनेचा उत्कृष्ट स्वयंसेवक राज्यस्तरीय पुरस्कार येथील दहिवडी कॉलेजमधील विद्यार्थी अनिकेत उद्धव वाघमारे यास जाहीर झाला आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत सन २०२०-२१ मध्ये निःस्वार्थ भावनेने व निष्ठेने समाजाची सेवा करणाऱ्यांना त्यांच्या अंगीकृत कामात प्रोत्साहन मिळावे व त्यांच्या निःस्वार्थ सेवेचा यथोचित गौरव व्हावा यादृष्टीने विविध राज्यस्तरीय पुरस्कार देण्याचा राज्य शासनाने निर्णय नुकताच घेतला आहे. त्यात वाघमारे यास हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

Satara, Satara-Today
14/08/2021 Page No. 1

पुण्य नगरी

# दहिवडी कॉलेजमध्ये किशोरवयीन मुलींसाठी कायदे विषयक शिबिर

**बिजवडी/ प्रतिनिधी**



दहिवडी ता. माण येथे शिबिराप्रसंगी मार्गदर्शन करताना सौ. ज्योती जाधव - सूर्यवंशी व उपस्थित इतर

दहिवडी कॉलेजमध्ये अठरा वर्षाच्या आतील मुलींना महिलांविषयीचे कायदे, पोक्सोसह इतर कायद्याविषयी इत्थंभूत माहिती मिळावी म्हणून दहिवडी कॉलेज दहिवडी व तालुका विधी सेवा समिती, माण (दहिवडी कोर्ट) यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिराचे आयोजन करण्यात आले.

दहिवडी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंके, ज्युनियर कॉलेज विभागाच्या उपप्राचार्या सौ. नंदिनी साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली कोरोनाचे सर्व नियम पाळून शिबीर पार पडले. या शिबिरामध्ये दहिवडी कोर्टाच्या तालुका विधी सेवा समिती रिटेनर लॉयर सौ. ज्योती जाधव - सूर्यवंशी यांनी महिलांविषयीचे कायदे त्यामध्ये महिलांची छेडछाड करणे, वाट आढवणे, अश्लील शब्दात बोलणे, शिवीगाळ करणे, शरीराला अवांछित स्पर्श करणे, हाणमार करणे, अश्लील मेसेज, फोटो, व्हिडिओ सोशल मीडियाच्या माध्यमातून सेंड करणे अशा गुन्ह्यांना होणारी शिक्षा व अशा गुन्ह्यांच्या संबंधित असणारा कायदा याविषयी इत्थंभूत माहिती देताना वेगवेगळी उदाहरणे देऊन सध्याच्या परिस्थितीत मुलींचे वर्तन कसे असावे व कसे नसावे या विषयी मार्गदर्शन केले.

उपप्राचार्य डॉ. बी. एस. बळवंत यांनी अध्यक्षीय भाषणात मोबाईलचा वापर कसा करावा त्याचबरोबर मुलींच्या मर्यादा काय आहेत. कॉलेजमधील व समाजातील मुलींचे वर्तन कसे असावे, याविषयी माहिती सांगताना वेगवेगळ्या घटनांचा संदर्भ दिला. सूत्रसंचालन ज्युनियर कॉलेज आर्टस् विभागाच्या प्रमुख सौ. एस. एम. पाटील यांनी केले. आभार प्रा. आर. बी. सूर्यवंशी यांनी केले. या कार्यक्रमाला तालुका विधी सेवा समितीचे ( दहिवडी कोर्ट ) वरिष्ठ लिपिक दंगेकर, कनिष्ठ लिपिक ननावरे, तालुका विधी सेवा समितीच्या पीएलव्ही सौ. अनिता जाधव, एम. बी. पाटील उपस्थित होते.

**Satara Edition**
Page No.6 November 14, 2021

सकाळ

# दहिवडी कॉलेजात मुलींना कायद्यांविषयी मार्गदर्शन

## माण तालुका विधी सेवा समितीतर्फे आयोजन; प्राध्यापक व वकिलांकडून प्रबोधन

**दहिवडी, ता. १४ :** दहिवडी कॉलेजमध्ये १८ वर्षांच्या आतील मुलींना महिलांविषयीचे कायदे, पोक्सो व इतर कायद्यांविषयी माहिती मिळावी म्हणून तालुका विधी सेवा समिती माण व दहिवडी कॉलेज दहिवडी यांच्या संयुक्त विद्यमाने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

दहिवडी कॉलेजचे प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे, ज्युनिअर कॉलेज विभागाच्या उपप्राचार्या नंदिनी साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरात तालुका विधी सेवा समितीच्या अनुचर वकील ॲड. ज्योती जाधव-सूर्यवंशी यांनी महिलांची छेडछाड, वाट अडवणे, अश्लील शब्दात बोलणे, शिवीगाळ करणे, शरीराला अवांछित स्पर्श करणे, मारणे, अश्लील मेसेज, फोटो, व्हिडिओ सोशल मीडियाच्या माध्यमातून पाठवणे हे सर्व कायदेशीरदृष्ट्या गुन्हे आहेत अशी माहिती दिली. या गुन्ह्यांना होणारी शिक्षा व अशा गुन्ह्यांच्या संबंधित असणारे कायदे याविषयी इत्थंभूत माहिती दिली, तसेच याबाबत वेगवेगळी उदाहरणे देऊन सध्याच्या परिस्थितीत मुलींचे वर्तन कसे असावे व कसे नसावे या विषयी मार्गदर्शन केले.



**दहिवडी : किशोरवयीन मुलींना कायदेविषयक माहिती देताना ॲड. ज्योती जाधव- सूर्यवंशी. उपस्थित बी. एस. बळवंत आदी मान्यवर.** (**रूपेश कदम** : सकाळ छायाचित्रसेवा)

दहिवडी कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. बी. एस. बळवंत यांनी आधुनिक युगात मोबाईलचा वापर कसा करावा. त्याचबरोबर मुलींच्या मर्यादा काय आहेत. कॉलेजमधील व समाजातील मुलींचे वर्तन कसे असावे याविषयी सांगताना वेगवेगळ्या घटनांचा संदर्भ दिला. ज्युनिअर कॉलेज आर्ट्स विभागाच्या प्रमुख एस. एम. पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

आर. बी. सूर्यवंशी यांनी आभार मानले. यावेळी तालुका विधी सेवा समितीचे वरिष्ठ लिपिक श्री. दंगेकर, कनिष्ठ लिपिक श्री. ननावरे, अनिता जाधव, एम. बी. पाटील उपस्थित होते.

Satara, Satara-Today
15/11/2021 Page No. 4

पुण्य नगरी



दहिवडी येथील महाविद्यालयात रक्तदान शिबीराच्या उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवर.

# दहिवडी महाविद्यालयात ४५ जणांचे रक्तदान

**बिजवडी / प्रतिनिधी**

रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष पद्मविभूषण शरदचंद्र पवार यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त येथील दहिवडी कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय छात्र सेना विभाग, माजी विद्यार्थी संघ, जिमखाना विभाग व अक्षय ब्लड बँक, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबीरात ४५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित केलेल्या या रक्तदान शिबीराचे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य डॉ. प्रदिपकुमार शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत, डॉ. ए. एन. दडस, प्रा. के. एस. शिंदे, डॉ. एम. जे. लुबाळ, केशव औटी यांची प्रमुख उपस्थिती होती. रक्तदान शिबीरात प्राध्यापक, शिक्षक,विद्यार्थी, विद्यार्थीनी यांनी रक्तदान केले. सर्व रक्तदात्यांना अक्षय ब्लड बँकेच्यावतीने अल्पोहार व प्रमाणपत्र देण्यात आले, संयोजकांना विशेष आभारपत्र व ट्रॉफी देण्यात आली, तर दहिवडी महाविद्यालयास खास सन्मानपत्र देण्यात आले.

शिबीर यशस्वीतेसाठी डॉ. शिवशंकर लेकूरवाळे, प्रा. हनुमंत कायंदे, प्रा. प्रदीप उंडे, प्रा. अमीर जाधव व अक्षय ब्लड बँकेचे सतिश साळुंखे व ब्लड बँकेचे कर्मचारी, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

सकाळ

# दहिवडी कॉलेजच्या इमारतींचे भूमिपूजन

**गोंदवले, ता. २७ :** भारत सरकारच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग विकास मंत्रालयाद्वारे दहिवडी कॉलेज दहिवडीमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील उपजीविका व्यवसाय विकास केंद्र व क्रीडा विभागासाठी नव्याने उभारण्यात येणाऱ्या इमारतींच्या बांधकामाचे भूमिपूजन कार्यक्रम रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य डॉ. प्रदीपकुमार शिंदे, सुनील पोळ, प्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत, प्राचार्य बी. एस. खाडे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी दादासाहेब चोपडे, डॉ. एम. जे. लुबाळ, प्रा. के. एस. शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

नव्याने उभारण्यात येणाऱ्या या इमारतींमध्ये कर्मवीर भाऊराव पाटील उपजीविका व्यवसाय विकास केंद्रांतर्गत महाविद्यालयात सुरू असलेल्या गांडुळ आणि गांडुळ खतनिर्मिती, मधमाशी पालन व मधप्रक्रिया, रेशीम उद्योग, आधुनिक रोपवाटिका तंत्र, तुषार प्रणाली आणि ठिबक सिंचन, कृषी उत्पादन विपणन या सहा प्रमाणपत्र अभ्यासक्रमांच्या एकूण ३५० प्रशिक्षणार्थी उद्योजकांना मार्गदर्शन, दिग्दर्शन व प्रात्यक्षिक कार्यासाठीच्या अद्ययावत पायाभूत सुविधा उपब्ध करून देण्यात येणार आहेत. भारत सरकारच्या अनुदानातून या इमारतींची उभारणी परशुराम महादेव शिंदे कन्याशाळेजवळ दहिवडी कॉलेजच्या जागेत होणार आहे. क्रीडा विभागाचा जिमखाना व जिमखाना साहित्य ठेवण्यासाठी स्वतंत्र इमारत उभारण्यात येणार असून, त्यात अद्ययावत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यावेळी रयत शिक्षण संस्थेचे आजीव सभासद पुरुषोत्तम जाधव, पर्यवेक्षक टी. एस. माने, प्रा. दत्तात्रय मांजरे, डॉ. सुहास कांबळे, डॉ. शिवशंकर लेकुरवाळे यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



**दहिवडी : कर्मवीर भाऊराव पाटील उपजीविका व्यवसाय विकास केंद्र व क्रीडा विभागासाठी नव्याने उभारण्यात येणाऱ्या इमारतींचे भूमिपूजनप्रसंगी डॉ. प्रदीपकुमार शिंदे, प्राचार्य डॉ. बी. एस. बलवंत, सुनील पोळ व मान्यवर.**

Satara, Satara-Today
28/10/2020 Page No. 2